# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### धुळे जिल्हयातील चिमठाणे येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी मुख्यालयी रहात नसल्याबाबत

**(१) ५८२९ (०६-०४-२०१५). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्हयातील चिमठाणे येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या दोन्ही वैद्यकीय अधिकाऱ्यासह १३ कर्मचारी मुख्यालयी रहात नसल्याने सुमारे ४१ हजार लोकसंख्येसाठी असलेले साक्री-शिरपूर व सोनगीर-दोडाई येथून रात्री अपरात्री येणाऱ्या रुग्णांना वैद्यकीय सेवा प्राप्त होत नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चिमठाणे प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांनी मुख्यालयीच राहून काम करावे यासाठी शासन त्यांना काही सुविधा पुरविणार आहे काय,

(३) असल्यास त्याचा तपशिल काय आहे,

(४) सदर तपशिल उपलब्ध नसल्यास त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१०-०२-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांना निवासस्थान व इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

(३) प्राथमिक आरोग्य केंद्राच्या आवारातच दोन वैद्यकीय अधिकाऱ्यांना निवासस्थाने उपलब्ध करुन देण्यात आली असून आरोग्य सहायक (पुरुष), आरोग्य सहायक (स्त्री), आरोग्य सेवक, औषध निर्माण अधिकारी यांनाही निवासस्थान व अनुषंगिक सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ग्रामीण भागातील एचआयव्हीग्रस्तांना शहरातून औषधे आणता यावीत तसेच शहरात उपचार घेता यावेत म्हणून गावातून मोफत एसटी प्रवासाची सुविधा उपलब्ध करुन देण्याचा प्रस्ताव**

**(२) ६६०८ (१०-०४-२०१५). श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामीण भागातील एचआयव्हीग्रस्तांना शहरातून औषधे आणता यावीत तसेच शहरात उपचार घेता यावेत म्हणून गावातून मोफत एसटी प्रवासाची सुविधा उपलब्ध करुन देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावावर निर्णय घेण्यात आला आहे काय व त्याची अंमलबजावणी कधीपासून सुरु होणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२३-०२-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) सदर प्रस्तावावर गृह (परिवहन) विभाग, नियोजन विभाग व वित्त विभाग यांच्या सहमतीची प्रक्रिया सुरु आहे. तद्नंतर सदर प्रस्ताव मा.मंत्रीमंडळासमोर सादर केला जाणार आहे.

---

**ठाणे येथे नवीन रुग्णालयासाठी मनोरुग्णालयाची**
**जागा मिळण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(३) ७०५० (०७-०४-२०१५). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील सिव्हील रुग्णालयामधील अडचणी सोडविण्यासाठी ३०० खाटांचे रुग्णालय ५४१ खाटांचे करणे तसेच सध्याच्या जागेवर रुग्णालयाचा विस्तार शक्य नसल्यामुळे ठाणे मनोरुग्णालयाच्या जागेवर नवीन रुग्णालयासाठी दहा एकर जागा मिळण्याचा प्रस्ताव शासनस्तरावर प्रलंबित आहे, हे खरेआहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नी शासनाकडे प्रलंबित असलेल्या प्रस्तावाचे थोडक्यात स्वरुप काय आहे व सदर प्रस्तावावर आतापर्यंत कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) असल्यास, उक्त प्रश्न भाग (१) मधील प्रकरणी सुरु असलेली कार्यवाही अद्याप पूर्ण झालेली नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच गोरगरिब रुग्णांना आरोग्यविषयक सुविधा उपलब्ध करुन देण्यासंदर्भात, सदर प्रकरणी आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत (२५-०२-२०१६) :**(१) जिल्हा रुग्णालयाचे ३०० खाटांवरुन ५४१ खाटांमध्ये श्रेणीवर्धन करण्याबाबतचा प्रस्ताव तसेच ठाणे मनोरुगणालयाच्या जागेवर नवीन रुग्णालयासाठी १० एकर जागा मिळण्याबाबतचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) ठाणे मनोरुग्णालयातील मोकळ्या जागेतील काही भाग BOT तत्वावर खाजगी संस्थांना देऊन त्याबदल्यात सुपर स्पेशालिटी रुग्णालये स्थापन करण्यास शासनाने तत्वत: मान्यता दिली आहे.

---

**राज्यातील माता अर्भक व बालमृत्युचे प्रमाण कमी करण्याबाबत**

**(४) ७३०१ (१०-०४-२०१५). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या आदिवासी विकास विभागामार्फत आदिवासी क्षेत्रात सन १९९५ पासून माता अर्भक व बालमृत्युचे प्रमाण कमी करण्यासाठी नव संजिवनी योजनेद्वारे लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांमधील गेल्या पाच वर्षातील लाभार्थी मातांची संख्येमध्ये प्रचंड प्रमाणात घट झाली असून खर्च मात्र अधिक झाला असल्याने आरोग्य संचालकाने याबाबत प्रश्न चिन्ह उपस्थित करुन नाराजी व्यक्त केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले तसेच लाभार्थी मातांची संख्या कमी व खर्च जास्त या तफावतीस जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली अथवा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२४-०२-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खामगांव (जि.बुलडाणा) येथील ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केन्द्रातील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(५) ८४९० (०७-०४-२०१५). श्री.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगांव (जि.बुलडाणा) परिसरात ग्रामीण भागातील ब-याच प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी यांचे पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पदे रिक्त असल्यामुळे ग्रामीण भागातील नागरीकांना शहरी भागातील रुग्णालयात उपचारासाठी जावे लागते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पदे सरळ सेवा भरतीव्दारे अथवा कंत्राटी पध्दतीने भरण्याबाबत जिल्हा शल्य चिकीत्सक यांना आदेशीत करणार आहेत काय,

(४) असल्यास, प्राथमिक आरोग्य केंद्रातील रिक्त वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या जागा भरण्याकरीता शासन काय उपाययोजना करणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१८-०२-२०१६) :**(१) हे अंशत: खरे आहे.

खामगांव तालुका जि.बुलडाणा येथे एकूण ५ प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यान्वित आहेत. सदर ठिकाणी वैद्यकीय अधिकारी गट-अ ची १० पदे मंजूर असून ४ स्थायी, २ बंधपत्रीत व २ अस्थायी वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत. तसेच एप्रिल-मे, २०१५ मध्ये २ वैद्यकीय अधिकाऱ्यांना खामगांव तालुक्यात पदस्थापना देण्यात आली आहे.

(२) नाही.

उपलब्ध वैद्यकीय अधिकाऱ्यांमार्फत रुग्णांना आवश्यक ती वैद्यकीय सेवा पुरविण्यात येते.

(३) व (४) स्वतंत्र निवड मंडळामार्फत वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे. तसेच वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या रिक्त पदांवर कंत्राटी पध्दतीने नेमणुका देण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळगांव जिल्हयात सामान्य रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय व प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रात वैद्यकीय अधिकारी व कर्मचा-यांची अनेक पदे रिक्त असल्याबाबत**

**(६) ११७६० (०७-०४-२०१५). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्हयात सामान्य रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रात वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची अनेक पदे रिक्त आहेत, हे खरे अह काय,

(२) असल्यास, उपजिल्हा रुग्णालय जळगांव येथे सिटी स्कॅन मशीन उपलब्ध नाही, रुग्णांना वॉर्ड कमी पडत असून व रुग्णांलयाच्या परिसरात घाणीचे साम्राज्य असल्यामुळे रोगराई पसरत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपजिल्हा रुग्णालयाकरिता सिटी स्कॅन मशीन उपलब्ध होणे करिता वार्ड संख्या वाढविणे करिता तसेच स्वच्छता संदर्भात शासनाकडून काय उपाययोजना करण्यात आल्या आहे वा येत आहे,

(४) अद्यापपर्यंत कोणतीही उपाययोजना करण्यात आली नसल्यास विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत

(५) असल्यास, रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत शासन काय कार्यवाही करणार आहे ?

**डॉ. दीपक सावंत (१८-०२-२०१६) :**(१) हे अंशत: खरे आहे.

जळगाव जिल्ह्यामध्ये १ जिल्हा रुग्णालय, ३ उप जिल्हा रुग्णालये व ७७ प्राथमिक आरोग्य केंद्रे कार्यान्वित आहेत. सदर आरोग्य संस्थांमध्ये महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट- अ वर्ग -१ संवर्गाची २१ पदे मंजूर असून ६ पदे भरलेली व १५ पदे रिक्त आहेत. वैद्यकीय अधिकारी यांची २३० पदे मंजूर असून १९८ पदे भरलेली व ३२ पदे रिक्त आहेत. गट-क संवर्गाची १३२२ पदे मंजूर असून न ११५९ पदे भरलेली व १६३ पदे रिक्त आहेत. तसेच गट-ड संवर्गाची ५३८ पदे मंजूर असून ४४० पदे भरलेली व ९८ पदे रिक्त आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) आरोग्य संस्थासाठी निश्चित केलेल्या यंत्रसामुग्रीच्या प्रमाणाकानुसार उप जिल्हा रुग्णालयांसाठी सिटी स्कॅन मशीन मंजूर नाही. उप जिल्हा रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. कंत्राटी तत्वावरील सफाई कामगारांकडून नियमितपणे साफसफाई करुन रुग्णालयाचा परिसर स्वच्छ ठेवण्यात येतो.

(४) प्रश्न उद्‌भवत  नाही.

(५) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ संवर्गाची रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याबाबतची प्रक्रिया सुरु आहे. वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्यासाठी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली असून अर्जाची छाननी सुरु आहे. तसेच कंत्राटी तत्वावर वैद्यकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. गट-क व गट-ड संवर्गाची रिक्त पदे भरण्याबाबत जिल्हा स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

---

**नागोठाणे (जि.रायगड) प्राथमिक आरोग्य केंद्रात बालरोग तज्ञ नसल्याबाबत**

**(७) १२५९८ (०६-०४-२०१५). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागोठाणे शहरासह (जि.रायगड) विभागात ५७ खेडी व वाडया असून नागोठाणे प्राथमिक आरोग्य केंद्रात बालरोग तज्ज्ञ नसल्याचे माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या केंद्रात बालरोग तज्ञ उपलब्ध नसण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, या केंद्रात तातडीने बालरोग तज्ञांची नियुक्ती करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत (१८-०२-२०१६) :**(१) व (२) सार्वजनिक आरोग्य विभागातीला विविध आरोग्य संस्थांच्या आकृतीबंधानुसार ग्रामीण रुग्णालय व त्यावरील रुग्णालयांसाठी तज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांचे पद मंजूर करण्यात आले आहे. तथापि, प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रासाठी तज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्याचे पद मंजूर नसून येथे एम.बी.बी.एस./बी.ए.एम.एस. अर्हताधारक वैद्यकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात येते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**गोकूंदा (ता.किनवट, जि.नांदेड) येथील उप जिल्हा रुग्णालयात वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या अनुपस्थितीमुळे रुग्णांची गैरसोय झाल्याबाबत**

**(८) १२६२० (०८-०४-२०१५). श्री.प्रदीप नाईक (किनवट) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोकूंदा (ता.किनवट, जि.नांदेड) येथील उप जिल्हा रुग्णालयात काही वैद्यकीय अधिकारी विनापरवानगी दिनांक ८ नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास गैरहजर होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या अभावी उपचारासाठी आलेल्या रुग्णांनी रुग्णालयास कुलूप लावले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(४) असल्यास, अशाप्रकारे रुग्णांची हेळसांड करणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१८-०२-२०१६) :**(१) व (२) होय.

(३) व (४) विनापरवानगी गैरहजर असणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्यांचे नोंदणी प्रमाणपत्र का रद्द करु नये अशी नोटीस देण्यात आली आहे. तसेच शिस्तभंग कारवाई प्रस्तावित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लातूर जिल्हयातील भादा, खरोळा, वोरी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांच्या रिक्त पदांबाबत**

**(९) १३३०२ (०८-०४-२०१५). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्हयातील भादा, खरोळा, वोरी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांची रिक्त पदे असल्याने रुग्णांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत असल्याची माहिती दिनांक १५ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, सदरील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१८-०२-२०१६) :**(१) नाही.

लातुर जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र, भादा, खरोळा व वोरी येथे वैद्यकीय अधिकाऱ्यांची प्रत्येकी २ पदे मंजूर असून सदर पदांवर स्थायी वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत. तसेच एकूण मजूर ९० पदांपैकी ८३ पदे भरलेली आहेत.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) गट-क व गट-ड संवर्गाची ७ रिक्त पदे भरण्याबाबत जिल्हा स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रांजणगाव गणपती (ता.शिरुर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील निवासी वैद्यकीय अधिकारी गैरहजर असल्याबाबत

**(१०) १६१७१ (०९-०४-२०१५). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रांजणगाव गणपती (ता.शिरुर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील निवासी वैद्यकीय अधिकारी गैरहजर असल्याने एका वयोवृध्द शेतकऱ्यास हृदयविकारासंबंधीचे प्राथमिक उपचारही मिळू शकले नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तपासणीकरीता खाजगी रुग्णालयाकडे नेण्याकरिता रुग्णवाहिका उपलब्ध असूनही देण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली वा येत आहे, चौकशी अंती दोषींवर शासकीय कामात केलेल्या दिरंगाई बद्दल कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१८-०२-२०१६) :**(१) होय.

(२) हे खरे नाही.

प्राथमिक आरोग्य केंद्र, रांजणगाव गणपती ता.शिरुर, जि.पुणे येथील रुग्णवाहिका नादुरुस्त असल्याने रुग्णास आपत्कालीन वैद्यकीस सेवा प्रकल्प (१०८) अंतर्गत रुग्णवाहिका उपलब्ध करुन देण्यात आली.

(३) सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली असून संबंधित अपचारी वैद्यकीय अधिकाऱ्यास क्षेत्रीय स्तरावरुन कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असून विभागीय चौकशीची कार्यवाही प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात कुष्ठरोगाच्या संख्येत वाढ होत असल्याबबत

**(११) १६२६४ (१९-०८-२०१५). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीरामपूर तालुका (जि.अहमदनगर) पेठगाव, माळवडगाव, टाकळी भात, उंदीरगाव, बेलापूर, मिनगावखैरी या ६ प्राथमिक आरोग्य केंद्रात गत डिसेंबर, २०१४ अखेर ७९ संशयित कुष्ठरोगी राज्याचे आरोग्य सेवा सहसंचालक (कुष्ठरोग व क्षयरोग) यांना आढळून आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अहमदनगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यात तसेच ठाणे, रायगड, मुंबई गडचिरोली, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर जिल्ह्यातील कुष्ठरोगांचे प्रमाण जास्त आढळून आले आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या रोगावर पूर्णवेळ काम करणा-या यंत्रणा शासनाने बंद केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार रुग्णांवर उपचार करुन रोगाचे समूळ उच्चटन करण्याच्या दृष्टीने तसेच रुग्णांचे पुनर्वसन करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती प्रभावी उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत (२३-०२-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.

श्रीरामपूर तालुक्यात माहे डिसेंबर, २०१४ मध्ये ७९ संशयित कुष्ठरुग्णांची नोंद झली होती. तसेच माहे एप्रिल ते डिसेंबर २०१४ दरम्यान एकूण ६१० संशयित कुष्ठरुग्णांची नोंद झाली होती. सर्व संशयितांची तपासणी तज्ज्ञांमार्फत केल्यानंतर त्यापैकी ५ नवीन कुष्ठरुग्ण आढळून आले व त्यांना मोफत बहुविध औषधोपचाराखाली आणण्यात आले.

(२) अंशत: खरे आहे.

अहमदनगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्याचे माहे डिसेंबर, २०१४ अखेर ०.४३ व सन २०१४-१५ मधील माहे मार्च, २०१५ अखेर कुष्ठरोगाचे प्रमाण ०.४८ इतके होते. इतर जिल्ह्यांचे कुष्ठरोगाचे प्रमाण :

| जिल्हा | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ |
|---|---|---|---|
| ठाणे | १.५९ | १.४० | ०.७९ |
| रायगड | २.२१ | १.६० | १.४९ |
| मुंबई | ०.४६ | ०.३१ | ०.३२ |
| गडचिरोली | ५.१८ | ३.५४ | ४.५१ |
| वर्धा | १.५४ | १.५१ | १.८५ |
| भंडारा | ३.१८ | २.४४ | ३.८३ |
| गोंदिया | १.८८ | २.०३ | १.९७ |
| चंद्रपूर | ४.०६ | ३.८३ | ३.३९ |

(३) हे खरे नाही.

राज्यात या कार्यक्रमाचे सर्वसाणारण आरोग्य सेवेमध्ये एकत्रिकरण झाले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) कुष्ठरोगाचे समूळ उच्चाटन करण्याच्या दृष्टीने आरोग्य शिक्षण व जनजागृती कार्यक्रमांतर्गत रॅली, प्रश्नमजुषा, वैद्यकीय अधिकारी, खाजगी वैद्यकीय व्यावसायिक यांची कार्यशाळा, आरोग्य कर्मचारी यांची कार्यशाळा, महिला मंडळ सभा, तसेच दर्शनीय भागात बॅन, पोस्टर, प्रदर्शने, होर्डीग्ज, हस्तपत्रिका वाटप, मेगाफोनद्वारे प्रचार, शालेय आरोग्य तपासणी, वेळोवेळी सार्वजनिक आरोग्य सेवेतील अधिकारी व कर्मचारी यांचे प्रशिक्षण घेऊन, आरोग्य कर्मचारी व आशा वर्करमार्फत सर्वेक्षणाद्वारे नवीन संशयित कुष्ठरुग्ण शोधून वेद्यकीय अधिकाऱ्यांमार्फत रोगनिदान करण्यात येऊन बहुविध औषधोपचार मोफत देण्यात येतो. (लवकर निदान व लवकर उपचार हा एकमेव प्रतिबंधात्मक उपाय आहे.)

कुष्ठरुग्णंचे पुनर्वसन करण्याच्या दृष्टीने राज्यातील २१९ कुष्ठरोग संदर्भ सेवा केंद्रांमार्फत गुंतागुंतीच्या कुष्ठरुग्णांना उपचार, एम.सी.आर.चप्पल, स्प्लिंट्स, गॉगल्स, सेल्फ केअर किट इत्यादी सेवा पुरविल्या जातात. विकृती प्रतिबंध शिबीरे, विकृती असलेल्या गरजू व पात्र रुग्णांची पुर्नरचनात्मक शस्त्रक्रिया करण्यात येते. कृष्ठरुग्णांना व त्यांच्या पाल्यांना व्यावसायिक दृष्टीन प्रशिक्षण नाशिक येथे देण्यात येते.

---

**सोलापूर जिल्हयातील शहर व ग्रामीण यामधील अंगणवाडया व शाळांमधील विद्यार्थ्यांच्या आरोग्य तपासणीबाबत**

**(१२) १६५६१ (१७-०८-२०१५). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्ह्यातील शहर व ग्रामीण यामधील अंगणवाड्या व शाळा यामधील विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यासाठी ५२ पथके नेमण्यात आली असून त्यांना वाहनेही उपलब्ध करुन देण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विद्यार्थ्यांच्या आरोग्य तपासणीमध्ये झालेल्या गोंधळामुळे ८ लाख ७२ हजार ६९९ विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, चौकशी निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) अद्यापपर्यंत कार्यवाही करण्यात आली नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत?

**डॉ. दीपक सावंत (२३-०२-२०१६)** :(१) व (२) राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत ० ते १८ वयोगटातील अंगणवाडी व शालेय स्तरावरील बालकांची आरोग्य तपासणी करण्यासाठी सन २०१४-१५ मध्ये सोलापूर जिल्ह्यासाठी एकूण ५२ वैद्यकीय पथकांची नियुक्ती करण्यात आली होती व त्यांना वाहने उपलब्ध करुन देण्यात आली होती. सदर पथकांद्वारे एप्रिल, २०१४ ते सप्टेंबर, २०१४ पर्यंतच्या पहिल्या टप्प्यात निश्चित केलेल्या उद्दिष्टानुसार ३,३४,३३१ पैकी २,७५,८९६ तर ऑक्टोबर, २०१४ ते मार्च २०१५ पर्यंतच्या दुसऱ्या टप्प्यात निश्चित केलेल्या उद्दिष्टानुसार ३,३४,३३१ पैकी २,७१,४८९ बालकांची तपासणी करण्यात आली. त्याचप्रमाणे ३९५०

शाळांमधून सुक्ष्म कृती आराखड्यानुसार वर्षातून एकदा निश्चित उद्दिष्टांनुसार एकूण ६,१०,४५२ विद्यार्थ्यांपैकी ५,३९,४६६ विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली आहे. सन २०१५-१६ मध्ये माहे जुलै, २०१५ अखेर ३९५० अंगणवाडीमधून १,९९,५६७ बालकांची आणि ८८,०६८ शालेय विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी पूर्ण करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अमरावती जिल्ह्यात वर्कऑर्डरशिवाय सुरु असलेले काम

**(१३) १६८५७ (१४-०८-२०१५). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यात सध्या शेतिशिवार योजनेअंतर्गत प्रशासनाने कामाचा सपाटा लावला असुन या अंतर्गत भातकुली तालुक्यातील वलगांव पेढी नदीच्या काढ मजबुतीकरणाचे काम पाटबंधारे विभागाला देण्यात आले असून या कामाकरिता साडेचार कोटी रुपये प्रशासकीय मान्यतेनंतर जळगांवच्या कंट्रक्शन कंपनीला वर्कऑर्डर न काढताच देण्यात आले असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नियमाप्रमाणे वर्कऑर्डरशिवाय काम करणे गैर असून सदर कंत्राटदराने साडेचार कोटीच्या कामाला सुरूवात केली आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करून दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२५-०२-२०१६) :**(१) नाही, सदर काम दिनांक ११/०६/२०१५ च्या कार्यारंभ आदेशा नुसार मे.एम.एस.कंस्ट्रक्शन कं. जळगाव यांना देण्यात आले व त्यानंतरच प्रत्यक्ष कामास सुरुवात करण्यात आली आहे.

(२) नाही, कार्यारंभ आदेशानंतर कामास प्रत्यक्ष सुरुवात करण्यात आली.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रायगड जिल्हयात सन २०१४-१५ या वर्षात झालेले ३४२ बालमृत्यू आणि ३७ मातामृत्यू

**(१४) १९८०६ (१४-०८-२०१५). श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम),**

**श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यात सन २०१४-१५ या वर्षात ३४२ बालमृत्यू आणि ३७ मातामृत्यू झाल्याचे माहे मे, २०१५ वा त्यादरम्यान आरोग्य विभागाने केलेल्या सर्व्हेक्षणातून निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यावरुन या जिल्ह्यात बालमृत्यू आणि मातामृत्यू रोखण्यासाठीच्या योजनांना फारसे यश मिळाले नसल्याचे सिध्द होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरचे बालमृत्यू व मातामृत्यू रोखण्याकरिता शासन स्तरावरुन कोणती कार्यवाही वा उपाययोजना करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२३-०२-२०१६) :**(१) होय, हे अंशतः खरे आहे.

सन २०१४-१५ मध्ये एकूण ५३४ बालमृत्यू झालेले असून त्यापैकी ४३२ अर्भकमृत्यू (० ते १ वर्षे) आणि ३३ मातामृत्यू आहेत. हे बालमृत्यू व मातामृत्यू विविध आजारांनी झालेले आहेत.

(२) व (३) बालमृत्यू व मातामृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी आरोग्य विभागामार्फत विविध योजनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

१. आजारी नवाजात बालकांच्या उपचारासाठी विशेष कक्ष (एसएनसीयू)
२. नवजात बालकांसाठी स्थिर कक्षाची स्थापना (एनबीएसयू)
३. बालमृत्यू अन्वेषण
४. जंतनाशक व जीवनसत्व “अ” मोहिम
५. नवजात आणि बालकांतील आजारांचे एकात्मिक व्यवस्थापन.
६. अर्भक व नवजात बालकांच्या स्तनपानाबाबत.
७. ग्राम बाल विकास केंद्र.
८. १५ आदिवासी जिल्ह्यामध्ये पोषण पुनर्वसन केंद्रे
९. आयडीसीएफ
१०. राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम
११. नियमित लसीकरण कार्यक्रम योजना.
१२. जननी शिशु सुरक्षा योजना (जेएसएसके) अशा योजनांचा समावेश आहे.

बालमृत्यू व मातामृत्यू अन्वेषण करुन वैद्यकीय अधिकारी, आरोग्य सहायक व आरोग्य सेविका यांच्याशी चर्चा करुन उपचारातील त्रुटींबाबत तज्ञ डॉक्टरांकडून मर्गदर्शन केले जाते. स्तनदा माता यांची आरोग्य तपासणी करण्यात येते व आजारी बालकांना, मातांना संदर्भात सेवा देण्यात येते. मातेचे हिमोग्लोबीन, बालकाचा जन्म झाल्यापासनू एक वर्षापर्यंत सर्व तपासण्या, लसीकरण व औषधोपचार मोफत देण्यात येतात. गरोदर व स्तनदा मातांना

समुपदेशन देण्यात येते, जेणेकरुन माता व बाल मृत्यूचे प्रमाण कमी होण्यास यश मिळत असून याबाबत करण्यात आलेल्या उपाययोजनांमुळे सन २०१२-१३, २०१३-१४ व २०१४-१५ मध्ये बालमृत्यू (० ते ५ वर्ष) चे प्रमाण प्रती हजार अनुक्रमे ६६७, ५५५ व ५३४ आणि माता मृत्यूचे प्रमाण प्रती हजार अनुक्रमे ३२, २८ व ३३ पर्यंत आले असून हे प्रमाण आणखी कमी करण्यासाठी उपाययोजना करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे नेवाळी (ता. कल्याण, जि.ठाणे) येथे प्राथमिक आरोग्य केंद्र सुरु करण्याबाबत**

**(१५) १९९५७ (१४-०८-२०१५). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे नेवाळी (ता. कल्याण, जि.ठाणे) येथील प्राथमिक आरोग्य केंद्र सन २००७ पासून बंद असल्यामुळे रूग्णांना निळजे येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचाराकरिता जावे लागते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे जिल्हा परिषदेमार्फत नेवाळी प्राथमिक आरोग्य केंद्र सुरू करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे सन २००७ मध्ये पाठविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्राथमिक आरोग्य केंद्रास मंजुरी मिळण्यास दिरंगाई करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली व करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२४-०२-२०१६) :**(१) हे खरे नाही.

मौजे नेवाळी येथे जिल्हा परिषद ठाणे अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर नाही. तथापि, मौजे नेवाळी गाव निळजे प्राथमिक आरोग्य केंद्रास जोडण्यात आलेले आहे हे खरे आहे.

(२) नेवाळी प्राथमिक आरोग्य केंद्र सुरु करण्याचा प्रस्ताव सन २००७ मध्ये शासनास प्राप्त झालेला नसून सन २०१३ मध्ये प्राप्त झाला होता. तथापि, मंजूर झालेल्या बृहत आराखड्यामध्ये नेवाळीचा समावेश नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जलयुक्त शिवार योजनेतील सिमेंट बंधारे व त्यांचे**
**अवाजवी अंदाज पत्रकाबाबत**

**(१६) २०८२८ (१४-०८-२०१५). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जलयुक्त बंधाऱ्यासाठी तयार करण्यात येणारे अंदाजपत्रक हे प्रत्यक्षात येणाऱ्या खर्चापेक्षा दीडपटीने जास्त रक्कमेचे केले जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित ठेकेदार ही कामे मिळविण्याकरिता १५ ते २० टक्के कमी दरांने भरतात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याचा अर्थ निविदा जास्त किंमतीची तयार केलेली असते, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, जलयुक्त शिवार योजनेतील सिमेंट बंधारे व त्यांचे अवाजवी अंदाज पत्रक या अयोग्य कारभाराबाबत दिनांक ०५ मे, २०१५ रोजी लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदयांना याबाबतचे निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, या निवेदनावर शासनाने काय कार्यवाही केली आहे, वा जलयुक्त शिवार यासारख्या महत्त्वाकांक्षी योजनेत यापुढे कामाचे मुल्यमापन करुन कामाची प्रत्यक्ष किंमत व करण्यात येणारे अंदाजपत्रक यामधून शासनाच्या निधीचा योग्य पध्दतीचे विनियोग होण्यासाठी शासन कोणती ठोस उपाययोजना करणार आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२५-०२-२०१६) :**(१) नाही.
(२) ४ % ते १७.७८% पर्यन्त कमी दराने निविदा प्राप्त झालेल्या आहेत.
(३) नाही.
(४) होय.
(५) निवेदनाच्या अनुषंगाने चौकशी करण्यासाठी संयुक्त समिति गठीत करण्यात आली असून निवेदनातील सर्व मुद्यांबाबत चौकशी करण्याचे निदेश समितीस देण्यात आले आहेत.

---

**काटोल तालुक्यातील लघु पाटबंधारे विभागातील बंधाऱ्यांचे काम निकृष्ट दर्जाचे केल्याबाबत**

**(१७) २३९६६ (१७-०८-२०१५). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लघु पाटबंधारे विभाग काटोल तालुका येथील लोकल सेक्टरमध्ये ४५ बंधाऱ्यांचे काम कोट्यवधी रुपयाने करण्यात येत असल्याने त्या कामामध्ये अधिकारी व ठेकेदार यांचा संगनमताने निकृष्ट दर्जाचे काम केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निकृष्ट दर्जाच्या कामामुळे पाझर तलावात पाणी थांबत नाही, हे खरे आहे काय,
(३) जलसंपदा लघु पाटबंधारे विभागातील गुणनियंत्रक अभियंत्यानी निकृष्ट दर्जाच्या कामाची चौकशी केली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,
(४) असल्यास, उक्त प्रकरणात संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२५-०२-२०१६) :**(१) व (२) नाही,
तथापि सदर तलाव पाझर तलाव नसून साठवण बंधारे आहेत. या एकूण ४८ साठवण बंधाऱ्यांपैकी ३८ साठवण बंधाऱ्याचे काम भौतिक दृष्ट्या पूर्ण झाले आहे. सदर साठवण

बंधाऱ्यांत लोखंडी पाट्या टाकून पाणी साठवण करुन ८३६ हेक्टर शेती प्रत्यक्ष सिंचनाखाली आलेली आहे.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुण्यातील डॉ.सलीम अली अभयारण्यासाठी निधीची तरतूद करण्याबाबत**

**(१८) २४१०० (१२-०८-२०१५). श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुण्यातील डॉ.सलीम अली अभयारण्यासाठी निधीची तरतूद नसणे, अभयारण्याची जबाबदारी स्वीकारण्यावरुन महानगरपालिका आणि वन विभागात एकमत होत नसणे, बेसुमार वृक्षतोड यामुळे या ठिकाणची जैवविविधता धोक्यात येण्याची बाब माहे एप्रिल, २०१५ च्या तिस-या आठवड्यात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या परिसराला वेळीच संरक्षण न दिल्यास हे अभयारण्य नष्ट होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२३-०२-२०१६) :**(१) व (२) हे खरे नाही.
प्रस्तुत ठिकाणी कोणतेही अभयारण्य अधिसूचित करण्यात आलेले नाही. सदर जागा वन विभाग किंवा महानगरपलिकेच्या ताब्यात नाही. सदर क्षेत्राचे प्रवेशद्वाराजवळ पुणे महानगरपालिकेचा कचरा डेपो व स्मशानभूमी असल्यामुळे त्याठिकाणी सरपणासाठी किरकोळ झाडे व फांद्यांची तोड झाली असल्याचे निदर्शनास आले आहे.
(३) उपरोक्त क्षेत्र वन विभागाच्या ताब्यात देण्याबाबतचा प्रस्ताव उपवनसंरक्षक, पुणे यांनी जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे सादर केला आहे. तसेच सदर ठिकाणाच्या संरक्षणाच्या दृष्टीने सद्यस्थितीत वन विभागामार्फत तेथे एका वनमजूराची नियुक्ती करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे नांद्रा (ता.पाचोरा, जि.जळगांव) येथील साठवण बंधारा पाझर तलावाची आतील भिंत व फॉरेस्ट मधील कुंभार गल्ली जवळील पाझर तलावाची भिंत मंजूर होणेबाबतचा ठराव**

**(१९) २४३८६ (१७-०८-२०१५). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे नांद्रा (ता.पाचोरा, जि.जळगांव) येथील साठवण बंधारा पाझर तलावाची आतील भिंत व फॉरेस्ट मधील कुंभार बल्ली जवळील पाझर तलावाची भिंत मंजूर होणेबाबतचा ठराव माहे डिसेंबर, २०१४ च्या सुमारास ग्रामपंचायतीने पुढील कार्यवाहीकरीता संबंधित विभागाकडे पाठवूनही अद्यापपर्यंत कोणतीच कार्यवाही केली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे परिसरातील शेतकऱ्यांना अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या तलावाची आतील भिंत व फॉरेस्ट मधील कुंभार बल्ली जवळील पाझर तलावाची भिंत बांधण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०१-०३-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

नांद्रा पाझर तलाव व नांद्रा गाव तलावांची दुरुस्ती करणेबाबत ग्रामपंचायत नांद्रा यांनी दिनांक २९/१२/२०१४ रोजीचे मासिक सभेत ठराव केला आहे.

उपविभागीय अधिकारी जिल्हा परिषद, लघु सिंचन उप विभाग, भडगांव यांचे स्तरावरुन नांद्रा पाझर तलाव व नांद्रा गाव तलावाच्या कामाचे सर्वेक्षण करुन दुरुस्तीचे अंदाजपत्रक तयार करण्याचे काम प्रगतीत आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परभणी जिल्हयातील जिंतूर शहरातील ट्रामा केअर सेंटर सुरु करण्याबाबत.**

**(२०) २४५४९ (१४-०८-२०१५). श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हयातील जिंतूर शहरातील ट्रामा केअर सेंटरच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इमारतीचे काम पूर्ण झाले परंतु तेथे आवश्यक असलेली पदे अद्याप भरण्यात न आल्यामुळे ट्रामा केअर सेंटर सुरु करण्यत आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ही पदे त्वरित भरण्याबाबत तेथील लोकप्रतिनिधींनी मागणी माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये संचालक आरोग्य मुंबई यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत (०३-०३-२०१६) :**(१) हे खरे आहे.

जिंतूर, जि.परभणी येथील ट्रामा केअर युनिटचे बांधकाम पूर्ण होऊन इमारत दि.१३.०३.२०१३ रोजी आरोग्य विभागाच्या ताब्यात घेण्यात आलेली आहे.

(२) अंशत: खरे आहे.

ट्रामा केअर युनिट, जिंतूर येथील मंजूर १२ पदांपैकी ७ पदे भरण्यात आली असून ५ पदे रिक्त आहेत. तथापि, ग्रामीण रुणालय व ट्रामा केअर युनिट, जिंतूर येथील उपलब्ध वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांच्यामार्फत अपघातग्रस्त रुग्णांना ताबडतोब वैद्यकीय सेवा उपलब्ध करुन देण्यात येते.

(३) हे खरे नाही.

(४) रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

---

**मौजे पंचाळा (ता.राजुरा, जि.चंद्रपूर) येथे लघुसिंचाई जलसंधारण राजुरा उपविमाग अंतर्गत पाझर तलावाचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(२१) २६४१४ (१७-०९-२०१५). अॅड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे पंचाळा (ता.राजुरा ,जि.चंद्रपूर) येथे लघुसिंचाई जलसंधारण राजुरा उपविभाग अंतर्गत ८० लाख निधी खर्च करुन पाझर तलावाचे  काम करण्यात आले त्या कामात पिचिंग दगड निकृष्ट दर्जाचे असल्याचे माहे डिसेंबर, २०१४ व त्या सुमारास निर्दशनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तलाव पिचींग कामात निकृष्ट दगड वापरुन चांगला दर्जा दाखविण्यासाठी लाल व काळ्या मातीचा वापर झाला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाकडून तलाव निर्मिती दर्जाची चौकशी केली आहे काय वा दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येणार आहे काय,

(४) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२५-०२-२०१६) :**(१) व (२) नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मेरगळवाडी (ता.दौंड) येथील वन गट क्र. ४९१ येथे वन उद्यान आणि वन पर्यटन स्थळ म्हणून विकसित करणेबाबत**

**(२२) २८२४४ (२७-१०-२०१५). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे मेरगळवाडी (ता.दौंड) येथील वन गट क्र. ४९१ येथे वन उद्यान व वन पर्यटन स्थळ म्हणून विकसित करण्याबाबत निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.वने मंत्री यांना माहे जून, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१५-१६ मध्ये वन उद्यान व वन पर्यटन स्थळ योजनेसाठी शासनाने किती निधीची तरतूद केली आहे,
(३) असल्यास, वन उद्यान / वन पर्यटन स्थळ म्हणून विकसित करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०७-०१-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) सन २०१५-१६ करिता इको-टुरिझम (राज्य) या योजनेसाठी रु. ३५७०.०० लक्ष इतक्या निधीची तरतुद करण्यात आली आहे.
(३) सदर पर्यटन स्थळाचा विकास करण्यासाठी आवश्यक प्रस्ताव सादर करण्याच्या सुचना दि.१६/०६/२०१५ रोजी प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) व अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास) महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना देण्यात आल्या आहेत. सदरहू प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही उपवनसंरक्षक, पुणे यांचे स्तरावर सुरु आहे.
(४) कार्यवाही सुरु असल्याने प्रश्न उद्भवत नाही.

---

## शाहुवाडी तालुक्यातील ९ गावांचा बफर झोन मध्ये समावेश करण्याबाबत

**(२३) २९०४३ (१३-०१-२०१६). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शाहुवाडी तालुक्यातील ९ गावांचा सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाच्या बफर झोन मध्ये समावेश केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर गावे वन विभागाकडून व्याघ्र प्रकल्पाकडे हस्तांतरित होणार आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर गावांवर कोणत्या जाचक अटी लादण्यात येणार आहेत,
(४) असल्यास, शासन या प्रकरणी कोणती कार्यवाही करणार आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२३-०२-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) उपरोक्त ९ गावातील क्षेत्र व्यवस्थापनासाठी कोल्हापूर वन्यजीव विभागाकडे हस्तांतरित करण्यात आले आहे.
(३) बफर क्षेत्रामध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या उपरोक्त ९ गावांपैकी ८ गावांचे फक्त वनक्षेत्र समाविष्ट करण्यात आले आहे. सदर ८ गावांवर कोणत्याही अटी लादण्याचा प्रश्न उद्भवत नाही. तथापि उखळु गावातील क्षेत्रात वन्यजीव संवर्धनाचे संदर्भात वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ च्या तरतूदी लागू होत असल्याने त्याप्रमाणे कार्यवाही सुरु आहे.
(४) बफर क्षेत्रातील बांधकामाबाबत स्थानिक सल्लागार समितीचे संमतीने नियमावली करणेची कार्यवाही सुरु आहे.

---

**पेंच व्याघ्र प्रकल्प नागपूर हद्दीत घुसलेल्या व्याघ्र शिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत**

**(२४) २९१९७ (१३-०१-२०१६). श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेंच व्याघ्र प्रकल्प नागपूर हद्दीत माहे मे २०१३ मध्ये वा त्या दरम्यान व्याघ्र शिकारी घुसल्याबाबतची माहिती मुख्य वन संरक्षक पेंच व्याघ्र प्रकल्प नागपूर यांना देवूनही त्याबाबत कोणतीही कारवाई करण्यात आली नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तदनुसार संबंधितांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) अदयाप कोणतीही कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२३-०२-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उमरेड (जि.यवतमाळ) वनपरिक्षेत्रातील सागवान तस्करीची नोंद किरकोळ चोरी म्हणून करीत असल्याबाबत**

**(२५) २९३४० (१३-०१-२०१६). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.गोपालदास अग्रवाल (गोंदिया) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरेड (जि.यवतमाळ) वनपरिक्षेत्रातील सागवान तस्करीची व्याप्ती दिवसागणिक वाढत असून वन विभागातील अनेक अधिकारी या तस्करीला किरकोळ चोरी होत असल्याच्या नोंदी करीत असल्याबाबत माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने रितसर चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती दोषी आढळून येणाऱ्या संबंधितांवर शासनाने काय कारवाई केली वा करणार आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२४-०२-२०१६) :**

(१) यवतमाळ जिल्ह्यातील पुसद वनविभागात येणाऱ्या उमरखेड परिक्षेत्रातंर्गत पिरंजी नियतक्षेत्राची माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये तपासणी केली असता एकूण २७५ सागवान थुट, नुकसानी रु.३,६८,७१९/- आढळून आले आहे. याप्रकरणी वन अधिकारी व कर्मचारी यांनी संगनमत केल्याचे आढळून आलेले नाही.

(२), (३) व (४) चौकशी करण्यात आली आहे.

चौकशीमध्ये सदरची वृक्षतोड स्थानिक व्यक्तींनी केले असल्याचे निष्पन्न झाले आहे.

सदर प्रकरणी एकूण ११ आरोपींना अटक करण्यात आली. त्यांच्याविरुध्द न्ययालयात प्रकरण दाखल करण्यंची कार्यवाही सुरु आहे. याप्रकरणी रु.३.४३,९०८/- किंमतीचे सागवान लाकूड जप्त करण्यात आले आहे. तसेच घराला लागून असलेल्या मालाची नुकसान भरपाई स्वरुपात रु.१२,७८७/- इतके आरोपींकडून वसूल करण्यात आले आहेत.

वनसंरक्षणाच्या कामात निष्काळजीपणा व दुर्लक्ष केल्याबद्दल संबंधित वनरक्षक, पिरंजी, क्षेत्र सहायक कृष्णापूर वर्तुळ व वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा.), उमरखेड यांना निलंबीत करण्यात आले आहे.

---

**सहा राज्यांमध्ये पसरलेला पश्चिम घाट संरक्षित व संवर्धित करण्यासाठी पर्यावरणदृष्टया संवेदनशील क्षेत्राचा नवीन मसुदा तयार करण्याबाबत**

**(२६) २९५१२ (१३-०१-२०१६). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सहा राज्यांमध्ये पसरलेला पश्चिम घाट संरक्षित व संवर्धित करण्यासाठी केंद्रीय पर्यावरण व वन विभागाने पर्यावरणदृष्टया संवेदनशील क्षेत्राचा नवीन मसुदा प्रसिध्द केला असून त्यामध्ये पुणे जिल्ह्यातील ३३७ गावे पर्यावरणदृष्टया संवेदनशील असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त गावांचा पर्यावरणाची हानी होऊ नये यासाठी राज्य शासनाने कोणती कार्यवाही केली वा येत आहे,

(३) अद्याप, कार्यवाही करण्यात आली नसल्यास, त्यामागील सर्वसाधारण कारणे काय आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२३-०२-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) उक्त ३३७ गावांपैकी २२५ गावे पश्चिम घाट परि-संवेदनशील क्षेत्रात समाविष्ट करण्याविषयी राज्य स्तरीय समितीने सादर केलेला अहवाल सादर केला असून सदर अहवाल राज्य शासनाने मान्य केला आहे. सदर अहवाल दिनांक ०७.०९.२०१५ रोजी पुढील कार्यवाहीसाठी केंद्र शासनास सादर करण्यात आला आहे. त्याअनुषंगाने पुढील कार्यवाही केंद्र शासनामार्फत होणे अभिप्रेत आहे.

---

**नागपूर वन विभागातील दक्षिण उमरेड वन परिक्षेत्रात लागवड करण्यात आलेल्या रोपवनात झालेला कोट्यवधीचा गैरव्यवहार**

**(२७) २९५६३ (१३-०१-२०१६). श्री.सुनिल केदार (सावनेर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर वन विभागातील दक्षिण उमरेड वन परिक्षेत्रात लागवड करण्यात आलेल्या रोपवनात कोट्यवधीचा गैरव्यवहार झाल्याचा आरोप महाराष्ट्र वन सेवानिवृत्त (पेन्शनर्स) असोसिएशनच्यावतीने केल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नाची चौकशी करण्यात आली काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदरील गैरव्यवहारातील आरोपींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप उक्त प्रश्नाबाबत कोणतीच कार्यवाही होत नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२६-०२-२०१६) :**(१) होय.

(२) सदर प्रकरणी विभागीय वन अधिकारी (दक्षता) यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमून सखोल चौकशी करण्यात आली.

(३) चौकशी समितीने सदर रोपवनाच्या कामामध्ये अनियमितता झाल्याचा अहवाल सादर केलेला आहे. यामध्ये सकृत दर्शनी जबाबदार असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांचे विरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात येत आहे. सद्य:स्थितीत जबाबदार वनक्षेत्रपाल-१, वनपाल-२, वनरक्षक-१ यांना निलंबीत करण्यात आले आहे. तसेच दोषी ८ अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द दि. २४.१२.२०१५ रोजी बेला पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा तपास चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्हयातील कळवण वनपरिक्षेत्रामधील मोकभनगी वनपरिमळातील उबरेबन येथील नगण्या डोंगरासह परिसरात सागाच्या वृक्षांची तोड करुन तस्करी करण्यात येत असल्याबाबत**

**(२८) ३०२१० (१३-०१-२०१६). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयातील कळवण वनपरिक्षेत्रामधील मोकभंनगी वनपरिमंळातील उबरेबन येथील नगण्या डोंगरासह परिसरात मोठ्या प्रमाणात सागाच्या वृक्षांची तोड करुन तस्करी करण्यात येत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील साग वृक्षाची अनधिकृत तोड व तस्करी रोखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कार्यवाही केली नसल्यास होणार विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२४-०२-२०१६) :**(१) कळवण वनक्षेत्रातील उंबरबेन कक्ष २६५ मध्ये जंगल भागाची पाहणी करीत असता आरोपी जळाऊ सरपन साग बुड २ फोडतांना दिसून आले. याबाबत दिनांक २५.८.२०१५ अन्वये वनगुन्हा जारी केला आहे. त्यांचेविरुध्द भारतीय वन अधिनियम १९२७ अन्वये कार्यवाही करण्यात आली आहे.
(२) व (३) वनक्षेत्रातील अधिकारी व वनकर्मचारी आपआपल्या कार्यक्षेत्रातील नियमितपणे गस्त करुन नियतक्षेत्राची तपासणी करतात. अवैध वृक्षतोड आढळल्यास तात्काळ कार्यवाही केली जाते.

वनसंरक्षणासाठी पुर्व भाग नाशिक वनविभागात सहायक वनसंरक्षण (संरक्षण व अतिक्रमण निर्मुलन) वणी व सुरगाणा यांचे पथक कार्यरत असून त्यांना गस्तीसाठी स्वतंत्ररित्या वाहन पुरविण्यात आलेले आहे.

वनसंरक्षणासाठी पुर्व भाग नाशिक मध्ये अधिकारी/कर्मचारी यांना शस्त्रात्र पुरवठा करण्यात आलेले आहेत.

अवैध वृक्षतोडीसाठी अतिसंवेदनशील नियतक्षेत्राचे वर्गीकरण करण्यात येऊन या नियतक्षेत्रावर संरक्षणासाठी विशेष लक्ष केंद्रीत केले जाते.

स्थानिक ग्रामस्थांना जंगल तोडीपासून परावृत्त करणेसाठी विविध योजनेअंतर्गत वनीकरण, जलसंधारण इ. कामे हाती घेऊन रोजगार उपलब्ध करुन दिलेला आहे.

---

### पश्चिम घाट परिसरातून कोकण तसेच दक्षिण महाराष्ट्रातील ८७९ गावे वगळण्याबाबत

**(२९) ३०६७५ (१३-०१-२०१६). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पश्चिम घाट परिसरातून कोकण तसेच दक्षिण महाराष्ट्रातील ८७९ गावे वगळण्यात यावी अशी शिफारस केंद्र शासनाला केली जाणार असल्याचा निर्णय मा.वनेमंत्री यांनी दिनांक ८ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास घेतलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रश्न भाग (१) मधील प्रकरणी घेतलेल्या निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) उक्त प्रश्नी अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच सदर प्रकरणी शेकडो गावांच्या समस्यांचा विचार करता सदर प्रकरणी लवकरात लवकर कार्यवाही करण्यासंदर्भात आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२३-०२-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) डॉ. कस्तुरीरंगन ह्यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरिय कार्यगटाने पश्चिम घाट परि-संवेदनशील क्षेत्र घोषित करण्याबाबत केंद्र शासनास अहवाल सादर केला आहे, त्यात महाराष्ट्रातील २१३३ गावांचा समावेश. तथापि राज्य स्तरीय समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने फक्त २० % पेक्षा जास्त नैसर्गिक भूप्रदेश असलेली १२५४ गावे पश्चिम घाट परि-संवेदनशिल क्षेत्रात समाविष्ट करण्याबाबत केंद्र शासनास प्रस्तावित केले आहे.
(३) राज्य स्तरीय समितीने सादर केलेला अहवाल दिनांक ०७.०९.२०१५ रोजी पुढील कार्यवाहीसाठी केंद्र शासनास सादर करण्यात आला आहे. त्याअनुषंगाने पुढील कार्यवाही केंद्र शासनामार्फत होणे अभिप्रेत आहे.

---

### बुलढाणा जिल्ह्यात ज्ञानगंगा, अंबावरवा अभयारण्य आणि लोणार सरोवर येथील वनक्षेत्रात बेकायदेशीर रित्या वृक्षांची तोड होत असल्याबाबत

**(३०) ३१९९७ (१३-०१-२०१६). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्ह्यात ज्ञानगंगा, अंबावरवा अभयारण्य आणि लोणार सरोवर येथील वनक्षेत्रात बेकायदेशीर रित्या वृक्षांची तोड होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गेल्या पाच महिन्यात ५९ प्रकरणी वन विभागात दप्तरी नोंदविण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या बेकायदा वृक्ष तोडीसंदर्भात आतापर्यंत किती जणांना अटक केली व त्यांचेवर कोणत्या कलमान्वये कारवाई करण्यात आली आहे,
(४) तसेच ही बेकायदा वृक्ष तोड थांबविण्याकरिता कोणती विशेष उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२३-०२-२०१६) :**(१) माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये ज्ञानगंगा व अंबाबरावा अभयारण्यात अवैध वृक्षतोडीचे एकूण ५ वनगुन्हे नोंदविण्यात आले आहे. तथापि लोणार सरोवर येथे अवैध वृक्षतोडीचे कोणतेही प्रकरणी निदर्शनास आलेले नाही.
(२) माहे ऑगस्ट, २०१५ ते डिसेंबर, २०१५ या कालावधीत अवैध वृक्षतोडीचे एकूण १७ वनगुन्हे नोंदविण्यात आले आहे.
(३) अवैध वृक्षतोडी संदर्भात एका आरोपीस अटक करण्यात आली आहे. सदर आरोपीवर भारतीय वन अधिनियम १९२७ चे कलम ६१, २६(१) (डी) (एफ) व वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ कलम २७, २९,३१ नुसार कार्यवाही करण्यात आली आहे.
(४) अवैध वृक्षतोडीवर नियंत्रण आणण्याच्या दृष्टीने खालील उपाययोजना करण्यात येतात.

- वन कर्मचाऱ्यांमार्फत अभयारण्यक्षेत्रात नियमीत व प्रभावीपणे गस्त केली जाते.
- मेळघाट व्याघ्र प्रकल्पाकरीता विशेष व्याघ्र संरक्षण दल मंजूर करण्यात आले आहे.

- अभयारण्य क्षेत्रातील नियतक्षेत्राची नियमित तपासणी करण्यात येते.
- मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील वनकर्मचाऱ्यांना वनसंरक्षणाच्या दृष्टीने गस्त घालण्यासाठी वाहने पूरविण्यात आली आहेत.
- १९-पिस्तुल, ३२-पंप एक्शन गन, वन कर्मचाऱ्यांना पूरविण्यात आल्या आहेत.
- अभयारण्य क्षेत्रात ७५ संरक्षण कुटी उभारण्यात आलेल्या आहेत.
- प्रकल्प क्षेत्रात ३१ तपासणी नाके असून त्याद्वारे नियमित वाहन तपासणी करण्यात येते.
- वनसंरक्षणासाठी लोकांना सहभाग वाढविणेकरीता ३९ ग्रामपरिसर विकास योजना स्थापन करण्यात आल्या आहेत.
- गुप्त माहिती पुरविण्याबाबत खबऱ्यांला बक्षीस देण्यासाठी गुप्त सेवा निधीची तरतूद करण्यात आली आहे.
- निरिक्षण मनोरे उभारण्यात आले असून त्यावर नियमित वनकर्मचारी तैनात असतात.

---

**चंद्रपूर जिल्ह्यातील ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या बफरझोन लगत दुर्गापूर डीप एक्स्टेशन नावाने सुरु होणाऱ्या कोळसा खाणीबाबत**

**(३१) ३२४८५ (१३-०१-२०१६). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या बफरझोन लगत दुर्गापूर डीप एक्स्टेशन नावाने कोळसा खाण सुरु होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ च्या तिसऱ्या आठवड्यात आढळून आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर खाणीमुळे वाघासोबत इतर वन्यप्राण्याचा अधिवास धोक्यात येणार आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुषंगाने बफर झोन लगतच्या परिसरात उक्त खाणीला परवानगी नाकारण्यासंदर्भात व वन्यप्राण्यांच्या अधिवासला धोका निर्माण होणार नाही यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२३-०२-२०१६) :**(१), (२), (३) व (४) दुर्गापूर डीप एक्सटैंशन नावाच्या कोळसा खाणीच्या १२१.५८ हे वनक्षेत्राचा वनेत्तर वापर करण्याच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने सदर क्षेत्रालगत वन्यप्राण्यांच्या अधिवास असल्याने त्याबाबत भारतीय वन्यजीव संस्था, देहरादून यांच्याकडून Study Report मागविण्यात आला होता. केंद्र शासनाने दिनांक १६.१२.२०१५ रोजीच्या आदेशान्वये दुर्गापूर डीप एक्सटेंशन नावाच्या कोळसा खाणीच्या १२१.५८ हे वनक्षेत्राचे वनेत्तर वापर करण्यासाठी काही अटी व शर्तीच्या अधीन राहून तत्वत: मान्यता प्रदान केली आहे. सदर अटी व शर्तीमध्ये भारतीय वन्यजीव संस्थेने सुचविलेल्या उपशमन योजनांची

अंमलबजावणी करणे तसेच वाघ व इतर वन्यजीवांच्या संरक्षण व संवर्धनासाठी प्रकल्प रकमेच्या २ टक्के रक्कम व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठानाकडे जमा करणे ह्या अटींचा समावेश आहे.

---

**कोल्हापूर जिल्हयातील चंदगड, गडहिंग्लज व आजरा परिसरात पाण्याअभावी वन्य प्राण्यांनी गावातील पिकांचे मोठया प्रमाणात नुकसान केल्याबाबत**

**(३२) ३२५५५ (१३-०१-२०१६). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील चंदगड, गडहिंग्लज व आजरा परिसरात पाण्याअभावी वन्य प्राण्यांनी गावाच्या दिशेने येऊन पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान केल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तद् नुसार नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२३-०२-२०१६) :**(१), (२), (३) व (४) कोल्हापूर जिल्हयातील आजरा, गडहिंग्लज व चंदगड परिसरात पाण्याची उपलब्धता नसल्याने पाण्याअभावी वन्य प्राण्यांनी गावाच्या दिशेने येऊन पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान केल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आलेले नाही.

तथापि वन्यप्राण्यांनी शेतपिकांचे नुकसान केलेल्या १०२ प्रकरणात प्रचलित शासन निर्णयान्वये नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शेतपिकांच्या नुकसानीपोटी रु. ४,२९,५८९/- इतकी रक्कम नुकसान भरपाई म्हणून माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये अदा करण्यात आली आहे.

---

**औरंगाबाद जिल्हयातील रेल्वे स्टेशनच्या पार्किगमधील वृक्षतोडीमुळे झालेल्या निष्पाप पक्षांच्या मृत्यूबाबत**

**(३३) ३३२१६ (१३-०१-२०१६). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हयातील रेल्वे स्टेशनच्या पार्किगमधील वृक्षतोडीमुळे झालेल्या निष्पाप पक्षांच्या मृत्यूप्रकरणी वन विभागाने वन्य जीव अधिनियमानुसार गुन्हा दाखल केला असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वृक्षतोड अणि पक्ष्यांच्या मृत्यूस जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर शासनाने काय कार्यवाही केली वा करणार आहे,
(३) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२३-०२-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ चे कलम ९ अन्वये सदर प्रकरणी ४ आरोपीविरुध्द गुन्हा नोंदविण्यात आला आहे. त्यापैकी तीन आरोपींना अटक करुन न्यायालयात हजर केले असता त्यांना न्यायालयाने एमसीआर मंजूर केला आहे. चौथ्या आरोपीने फरार राहून अटकपूर्व जामिन घेतला आहे. संबंधितांविरुध्द मा. न्यायालयात दिनांक २५.०१.२०१६ रोजी तक्रारपत्र (Complaint) दाखल करण्यात आले आहे.

---

## म्हैसमाळ दौलताबाद (ता.खुलताबाद, जि.औरंगाबाद) येथील वन विभागात वनसमितीच्या नावाखाली पर्यटकांची होणारी लुट थांबविण्याबाबत

**(३४) ३३२१९ (१३-०१-२०१६). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) म्हैसमाळ दौलताबाद (ता.खुलताबाद, जि.औरंगाबाद) येथे वन विभागात लाखो रुपये खर्च करुन येणाऱ्या पर्यटकांसाठी खेळणी साहित्य उद्यानासह तारा कंपाऊंड व शेड लावून तयार केले परंतु या ठिकाणी सुविधा उपलब्ध नसल्याने पर्यटकांची वनसमितीकडून लुट होत असल्याचे माहे मे, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, येथील वनसमितीच्या नावाखाली पर्यटकांची होणारी लुट थांबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२३-०२-२०१६) :**(१) हे खरे नाही.

म्हैसमाळ व दौलताबाद येथील उद्यानात पर्यटकांच्या सोईच्या दृष्टीकोणातून पॅगोडा बांधणे, एमएस अंब्रेला बांधणे, निरिक्षण मनोरा उभारणे, पेव्हर ब्लॉक बसविणे, वनउद्यानात लहान मुलांसाठी खेळणी बसविणे इ. कामे करण्यात आली असून ह्या सुविधा कार्यान्वीत आहेत.

पर्यटकांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आहे. उपहारगृह तसेच महिला व पुरुषांसाठी वेगवेगळे स्वच्छतागृह कार्यान्वित आहे. संयुक्त वन व्यवस्थापन समितीकडून प्रति व्यक्ती नियमानुसार शुल्क आकारण्यात येत असून, प्राप्त रक्कम हे समितीचे विकास निधी खात्यामध्ये जमा करण्यात येते. वन समितीच्या नावाखाली पर्यटकांची लुट होत असल्याची कोणतीही तक्रार मे, २०१५ ररम्यान प्राप्त झालेली नाही.

(२) व (३) संयुक्त वनव्यवस्थापन समितीच्या नावाखाली पर्यटकांची लुट होते असे आढळून आलेले नाही. त्यामुळे कार्यवाहीचा प्रश्न उपस्थित होत नाही.

---

**राज्यात वाघांचे संरक्षण आणि स्थलांतराबाबत वन विभाग उदासीन असल्याबाबत**

**(३५) ३३४३७ (१३-०१-२०१६). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वाघांचे संरक्षण आणि स्थलांतराबाबत वन विभाग उदासीन असल्याचे माहे जुलै, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्पात २ वर्षात ५ वाघांनी केलेले स्थलांतर स्वयंमसेवी कार्यकर्त्यांच्या सतर्कतेमुळे लक्षात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने व्याघ्र सुरक्षा आणि स्थलांतर याबाबत काही उपाययोजना केल्या आहेत काय,

(४) अद्याप कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२३-०२-२०१६) :**(१) व (२) हे खरे नाही.

वाघांची त्यांचे क्षेत्राकरिता व इतर नैसर्गिक बाबी करीता स्थलांतर होणे हा एक निसर्गक्रम आहे. त्यानुसार सन २०१२ पासून नवेगांव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पातून ५ वाघ स्थलांतरीत झाले आहेत.

(३) वाघांच्या सुरक्षिततेच्या अनुषंगाने नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पात खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

- प्रकल्प क्षेत्राकरीता विशेष व्याघ्र संरक्षण दल मंजूर करण्यात आले आहे.
- महत्वाच्या ठिकाणी ५६ संरक्षण कुट्या उभारण्यात आल्या आहेत.
- संरक्षण कुट्यांवर २४ तास वनकर्मचारी तैनात असतात.
- २४ तास बिनतारी संदेश यंत्रणा कार्यरत आहे.
- १७ बेसस्टेशन व ५६ वॉकीटॉकीचा उपयोग करुन संदेश देवाणघेवाणीचे जाळे निर्माण करण्यात आले आहे.
- वन संरक्षणाची कामे करतांना अधिकारी/वन कर्मचाऱ्यांना स्वयं संरक्षणाच्यादृष्टीने ८ पिस्तोल उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.
- १-अधिकारी व ६ वनकर्मचाऱ्यांना गोळीबार उजळणी प्रशिक्षण जिल्हा पोलीस अधिक्षक, गोंदिया यांचेमार्फत देण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पाठगाव (ता.भुदरगड, जि.कोल्हापूर) येथील नवीन पाणी योजनेतील पाईप लाईनचे खोदकाम वन खात्याच्या हद्दीतून केल्याबाबत**

**(३६) ३४४४० (२१-१२-२०१५). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाठगाव (ता.भुदरगड,जि.कोल्हापूर) येथील ग्रामपंचायतीने नवीन पाणी पुरवठा योजनेतील पाईप लाईनचे खोदकाम वन खात्याच्या हद्दीतून केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामपंचायत पाठगाव यांनी पाईप लाईन खोदकाम करताना वन खात्याची परवानगी न घेतल्यामुळे प्रादेशिक वन संरक्षक, कोल्हापूर यांनी वन खात्याचे ४ कर्मचारी व अधिकारी यांचे निलंबन केले, हे ही खरे आहे काय,

(३)असल्यास, गावाच्या गरजेनुसार आपवादात्मक स्थितीत पाईप लाईन वन खात्याच्या हद्दीतून जात असल्यास शासनाने वन कायद्यामध्ये शिथिलता आणण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०१-०३-२०१६) :**(१) व (२) ग्रामपंचायत पाटगांव, ता.भुदरगड जि.कोल्हापूर यांनी कडगांव वनक्षेत्रांतर्गत वनक्षेत्रामध्ये ग्रामीण पाणी पुरवठा योजनेमार्फत पाईप लाईनचे काम वन खात्याची परवानगी न घेता केले आहे. सदर प्रकरणी कर्तव्यामध्ये कसूर केल्यामुळे वन खात्याचे ४ कर्मचारी व अधिकारी यांचे निलंबन केले असून, त्यांची विभागीय चोकशी चालू आहे.

(३) केंद्र शासनाने दि. १३/०२/२०१४ रोजीच्या मार्गदर्शक सूचनेनुसार वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत काही अटींच्या अधीन राहून शासकीय यंत्रणेद्वारे केल्या जाणाऱ्या पिण्याच्या पाण्याच्या पुरवठा व पाण्याच्या पाईपलाईनसाठी १ हेक्टर पर्यंत वनजमिन वळती करण्याचे अधिकार राज्य शासनाला दिले आहेत. त्यामुळे प्रकल्प यंत्रणेने वन (संवर्धन) अधिनियम, १९८० मधील तरतुदीनुसार प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कर्जत (जि.अहमदनगर) येथील माळढोक पक्षी अभयारण्यातील खाजगी क्षेत्रातील जमिनीची खरेदी विक्री करण्याच्या निर्णयाबाबत**

**(३७) ३४४८० (१३-०१-२०१६). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत (जि.अहमदनगर) येथील माळढोक पक्षी, अभयारण्यातील खाजगी क्षेत्रातील जमिनीची खरेदी विक्री करण्याचा निर्णय शासनाने माहे जुलै, २०१५ च्या पहिल्या आठवड्यात घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२३-०२-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) व (३) माळढोक अभयारण्याच्या पुनर्रचनेस राष्ट्रीय वन्यजीव मंडळाच्या स्थायी समितीने मान्यता दिली असून त्या अनुषंगाने सुधारीत अधिसूचना जारी करण्याची कार्यवाही शासन स्तरावर चालू आहे. पुनर्रचित अभयारण्यात फक्त ४८०.२९ हेक्टर खाजगी क्षेत्राचा समावेश असून त्याच्या संपादनाची कार्यवाही झालेली आहे. सदर अधिसूचना जारी झाल्यावर खाजगी जमिनीविषयक बाबींवर वन्यजीव (संरक्षण) अधिनियमाच्या तरतूदी आकृष्ट होणार नाहीत.

---

**टाळंबा केरवडे (ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग) येथे मोठे पाटबंधारे प्रकल्पाचे काम व वन जमिनी संपादित करण्याबाबत**

**(३८) ३४६०५ (१३-०१-२०१६). श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) टाळंबा केरवडे (ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग) येथे मोठ्या पाटबंधारे प्रकल्पाचे कामास केंद्रीय जल आयोगाची व वन जमिनी संपादित करण्याकरिता वन विभागाने राज्य शासनास आपला अहवाल सादर केला आहे काय,
(२) असल्यास, उक्त अहवालातील शिफारशी काय आहेत, तदनुसार उक्त प्रकल्पास प्रत्यक्षात केव्हापासून सुरवात होणार आहे,
(३) असल्यास, सदर प्रकल्प सुरू न होण्यामागची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०१-०३-२०१६) :**(१) व (२) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी टाळंबा प्रकल्पाकरिता वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत ६२३.३१८ हे. वनजमिन वळतीकरणाचा प्रस्ताव नामंजूरीच्या शिफारशीसह दि.१६/०७/२०१३ रोजीचे पत्रान्वये राज्य शासनास सादर केला होता. तथापि, टाळंबा प्रकल्पाचे वनक्षेत्र पश्चिम घाटातील अत्यंत संवेदनशील क्षेत्र असून, त्याचा पर्यावरण संवेदनशील क्षेत्रामध्ये समावेश आहे. सदर प्रकल्पामुळे मोठ्या प्रमाणावर पर्यावरणाचा ऱ्हास होणार असल्याने सदरचा प्रस्ताव केंद्र शासनास शिफारस न करण्याचा निर्णय दि.२३/०१/२०१४ रोजीचे पत्रान्वये घेतला आहे.

जलसंपदा विभागाने सदर प्रस्तावाबाबत पुनर्विचार करण्याबाबत विनंती केली आहे. त्यास अनुसरुन मा.मंत्री (वने) यांचे अध्यक्षतेखाली मा.मंत्री (जलसंपदा) यांचे उपस्थितीत वन विभाग व जलसंपदा विभागातील संबंधित अधिकारी यांची संयुक्त बैठक घेण्याचे प्रस्तावित आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे धनोडी (ता.वरुड, जि.अमरावती) येथील वनउद्यानाच्या कामाचा दर्जा निकृष्ट असल्याबाबत**

**(३९) ३४९०४ (१३-०१-२०१६). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे धनोडी (ता.वरुड, जि.अमरावती) येथील साडेबारा एकर जमिनीवर आकर्षक वनउद्यान साकारत असून सदरहू वनउद्यानाच्या कुंपण भिंतीचे बांधकाम पूर्ण झाले असून या वनउद्यानाच्या कामाचा दर्जा निकृष्ट असल्याची तक्रार आर.टी.आय कार्यकर्ते श्री.हेमंत देशमुख यांनी संबंधितांकडे केल्याचे माहे, ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बांधकामाचे कुठलेही मोजमाप न करता तसेच मोजमाप पुस्तीकेत न नोंदविता देयके प्रदान करण्यात आले व असा अहवाल उपवन अभियंता, अमरावती वनवृत्त यांनी उपवनसंरक्षक, अमरावती यांना पाठविला आहे तरी शासन त्वरीत चौकशी करुन आवश्यक कार्यवाही करणार वा करीत आहे काय,
(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२३-०२-२०१६) :**(१) मौजे धनोडी (ता.वरुड, जिल्हा अमरावती) येथील वनक्षेत्रावर उभारण्यात येत असलेल्या निसर्ग पर्यटन कामाअंतर्गत चेनलिंग फेन्सिंगचे काम विहित मापदंडनुसार झाले नसल्याबाबत श्री. हेमंत देशमुख, वरुड यांनी दिनांक ३१/१२/२०१४ रोजी अमरावती वनविभागाकडे तक्रार केली आहे, हे खरे आहे.
(२) सदरहू तक्रारीच्या अनुषंगाने उपवन अभियंता, अमरावती यांनी सदर कामाची पाहणी केली असून, त्यांनी सादर केलेल्या अहवालानुसार संबंधित कंत्राटदाराने चेनलिंग फेन्सिंगचे काम तसेच या कामासाठीचे साहित्य विहित मापदंडानुसार वापरले नसल्याचे निदर्शनास आले आहे.

प्रत्यक्ष झालेल्या कामाचे मोजमापानुसार उक्त कंत्राटदारास रक्कम अदा करण्यात आली असून, अमरावती वनवृत्तापूरता सदर कंत्राटदारास काळ्या यादीत टाकण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सेलू तालुक्यातील (जि.वर्धा) बोर व्याघ्र प्रकल्पातील वाघिणीचे दोन बछडे बेपत्ता असल्याबाबत**

**(४०) ३५१६३ (१३-०१-२०१६). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वर्धा जिल्हयातील सेलू तालुक्यातील बोर व्याघ्र प्रकल्पातील कॅटरिना नामे वाघिणीच्या आठ महिन्यांच्या चार बछडयांपैकी दोन बछडे गत एका महिन्यापासून वनविभागाच्या अधिकारी व कर्मचा-यांना दिसले नाहीत परंतु व्याघ्र प्रकल्पाचे अधिकारी वाघिणीसोबत तीन बछडे असल्याचे सांगत असल्याचे माहे सप्टेंबर २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास, सदर दोन बछडयांची शिकार झाली की अन्य कारणाने त्यांचा मुत्यु झाला अशी भिती वर्तवली जात आहे परंतु व्याघ्र प्रकल्पाचे अधिकारी मात्र तो बछडा जंगलातच इतरत्र हरविला असावा असा अंदाज लावून वेळ मारुन नेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दीड वर्षापूर्वी राममंदीर परिसरात पर्यटकांना नियमित दर्शन देणारा वयस्क वाघ एकाएकी गायब झालेल्या वाघाचे शिका-याकडून वा शेतक-यांनी शेताच्या कुंपणात लावलेल्या वीज तारातील जिवंत विद्युत प्रवाहाने ठार झाला असावा अशी दाट शक्यता वर्तवली गेली होती, व्याघ्र गणनेतही तो वाघ कधीच दिसला नाही तरी कायमचा गायब झालेला वाघ व्याघ्र प्रकल्पाच्या अधिका-यांना दिसला होता असा दावा करित ते प्रकरण दडपले गेले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनातर्फे व्याघ्र प्रकल्पासाठी कोटयवधी रुपयांचा खर्च होत असूनही वाघांच्याच सुरक्षेचा मुद्दा ऐरणीवर येत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रकरणाची वरिष्ठ पातळीवरुन चौकशी करुन दोषी अधिका-यांवर शासनाने कोणती कडक कारवाई केली अथवा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, याबाबत विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२३-०२-२०१६) :**(१), (२), (३) व (४) हे खरे नाही.
(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**डांगराव (ता.देवरी) येथील नवेगाव नागझीरा पिंताबर टोला गेट व्याघ्र राखीव क्षेत्र येथे सुविधा नसल्यामुळे पर्यटकांची संख्या कमी झाल्याबाबत**

**(४१) ३५४०८ (१३-०१-२०१६). श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डांगराव (ता.देवरी) येथील नवेगाव नागझीरा पिंताबर टोला गेट व्याघ्र राखीव क्षेत्र येथील पर्यटनस्थळी पाण्याची सोय नसून रस्त्यांना खड्डे असल्यामुळे येथे पर्यटकांची भेट देण्याची संख्या कमी झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे तेथील पर्यटनावर अवलंबून असलेलेल युवकांना रोजगारांची संधी मिळत नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) असल्यास, त्याचे स्वरुप काय आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२३-०२-२०१६) :**(१) हे खरे नाही.
डोंगरगांव . ता. देवरी येथील नवेगांव-नागझिरा पितांबरटोला गेट व्याघ्र राखीव क्षेत्र येथील पर्यटन स्थळी पिण्याच्या पाण्याची सोय आहे. तसेच सन २०१५-१६ जिल्हा वार्षिक योजनांतर्गत सदर पर्यटन स्थळी विंधन विहीर खोदणे व सोलर सबमर्सिबल पंप बसविणे प्रस्तावित आहे. तसेच डोंगरगांव वनपरिक्षेत्राअंतर्गत ५१.५० कि.मी. रस्त्यावर मुरुम टाकून रस्तादुरुस्तीचे काम प्रस्तावित आहे.
(२) स्थानिक युवकांना रोजगाराची संधी म्हणून पिंताबरटोला गेटवर पर्यटकांना फिरतीवर नेण्यासाठी ९ युवकांना गाईडची कामे देण्यात आलेली आहेत.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे जिल्ह्यात निसर्ग निर्वाचन केंद्र उभारुन त्यात सस्तन प्राणी, पक्षी, सरपटणारे प्राणी प्रजाती ठेवण्याची बाब शासनाच्या विचाराधीन असल्याबाबत**

**(४२) ३५४२१ (१३-०१-२०१६). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्ह्यात निसर्ग निर्वाचन केंद्र उभारुन त्यात सस्तन प्राणी, पक्षी, सरपटणारे प्राणी प्रजाती ठेवण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर विचाराधीन बाबीवरील शासनाचा विचार पूर्ण झाला आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२३-०२-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रावेर (जि.जळगांव) येथील सातपुडा पर्वत येथे मोठया प्रमाणात होत असलेली अवैध वृक्ष तोड**

**(४३) ३६०८१ (१३-०१-२०१६). श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रावेर (जि.जळगांव) येथील सातपुडा पर्वत येथे मोठया प्रमाणात अवैध वृक्षतोड झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास अवैध वृक्ष तोड करणा-यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) सदर परिसरात वृक्ष लागवड करण्यासाठी शासानाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अदयाप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२५-०२-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) रावेर (जि.जळगाव) येथील सातपुडा पर्वत येथे मोठ्या प्रमाणात अवैध वृक्षतोड झालेली नसल्याने कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(३) व (४) पाल वनक्षेत्रात सन २०१३-१४ व २०१४-१५ या दोन वर्षात मिळून एकूण ८०.२८ हे क्षेत्रावर वृक्ष लागवड करण्यात आली आहे. तसेच ५० हे. क्षेत्रावर सलग समतल चर घेऊन त्यावर गवताची पेरणी करण्यात आलेली आहे.

---

**नागपुर शहरातील सेमिनरी हिल्स येथे वन कोठडी सुरु करणेबाबत**

**(४४) ३६२८९ (१३-०१-२०१६). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहर सेमिनार हिल्स येथील वन विभागाची वन कोठडी मागील एक वर्षापासून अद्ययावत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वन आरोपींना संबंधित पोलीस स्टेशनच्या कोठडीत ठेवले जात आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, वन कोठडी तातडीने सुरु करण्याकरिता शासनाची योजना आहे काय,

(४) असल्यास, लाखो रुपये खर्च करुन वन विभागाने वन कोठडी सेमिनार हिल्स नागपूर येथे तयार आहे त्या कोठडीचा उपयोग शासन करणार आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२३-०२-२०१६) :**(१) नागपूर शहर सिमेनरी हिल्स येथील वन विभागाच्या वन कोठडीचे बांधकाम पूर्ण झाले आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) शासन योजनेनुसार वन गुन्ह्यात पकडण्यात आलेल्या आरोपींना ताब्यात ठेवण्याकरिता वनवृत्त स्तरावर वन कोठडी उभारण्यात आलेली आहे. सदरहू वन कोठडीचा वापर शासन करणार आहे.

(५) सदरहू वन कोठडीच्या विद्युत पुरवठा कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग नागपूर यांचेकडे आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्यात आला असून, विद्युत पुरवठा तातडीने सुरु करण्यासाठी त्यांच्याकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

---

**मौजे रास्तळ (ता.जाफ्राबाद, जि.जालना) येथील स्थानिक शेतकऱ्यांचे रोही जातीच्या वन्यप्राण्यामुळे शेतीपिकाचे नुकसान होत असल्याबाबत**

**(४५) ३६६७१ (१३-०१-२०१६). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे रास्तळ (ता.जाफ्राबाद, जि.जालना) येथील स्थानिक शेतकऱ्यांनी रोही जातीच्या वन्यप्राण्यामुळे शेतीपिकाचे नुकसान होत असल्याबाबतच्या तक्रारी माहे जुन व जुलै २०१५ मध्ये वा त्यादरम्यान वनक्षेत्र परिरक्षण अधिकारी जालना यांना दिल्या आहेत, हे खरे आहे काय

(२) असल्यास, प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने वन विभागाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे, उक्त प्रकरणी रोही जनावरांमुळे शेतीपिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाची भुमिका काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२३-०२-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) वन्यप्राण्यांद्वारे शेतपिकांचे नुकसान झाल्याची तक्रार प्राप्त झाल्यावर तात्काळ प्रचलित शासन निर्णयान्वये कार्यवाही करण्यात येऊन संबंधित नुकसानग्रस्त शेतकऱ्यांस नुकसान भरपाई अदा करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे गणेवाडी (ता.पाटण, जि.सातारा) येथील वनखात्याच्या हद्दीतून रस्ता करण्यास वन खात्याची परवानगी मिळण्याबाबत**

**(४६) ३६८४८ (१३-०१-२०१६). श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे गणेवाडी (ता.पाटण, जि.सातारा) याठिकाणी जाण्यास मौजे ठोमसे येथील वनखात्याच्या सर्व्हे नं ५५० मध्ये वनहद्द असल्याने या गांवास जाण्यास रस्त्याचे काम करता येत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त गावातील वनखात्याच्या हद्दीतून रस्ता करण्यास वन खात्याची परवानगी मिळावी याकरीता संबंधित गावांतील ग्रामस्थांनी प्रस्ताव सादर करुन राज्य शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाच्या वनविभागाने या प्रस्तावास मान्यता देवून सदरचा रस्ता पुर्ण करण्याकरिता परवानगी दिली आहे काय,

(४) असल्यास, शासनाने परवानगी देणेबाबत कोणता निर्णय घेतला आहे, अद्यापही निर्णय घेतला नसल्यास निर्णय न घेण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०१-०३-२०१६) :**(१), (२), (३) व (४) वनजमिनीतून रस्त्याच्या बांधकामासाठी वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत रितसर प्रस्ताव पाठवून केंद्र शासनाच्या पूर्व परवानगीने रस्त्याचे बांधकामासाठी तरतूद आहे. अथवा रस्त्यासाठी १.०० हे. पेक्षा कमी वन जमीनीची मागणी असल्यास त्याकरिता अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वनहक्काची मान्यता) अधिनियम, २००६ व २००८ नुसार प्रस्ताव सादर करुन पूर्व परवानगीने घेता येते.

मा.श्री.शुभूराज देसाई, विधानसभा सदस्य यांनी सदर रस्त्याचे बांधकामासाठी परवानगी देण्याबाबत विनंती केली आहे. ग्रामस्थाकडून परवानगी मिळणेसाठीचा प्रस्ताव अद्याप सादर झालेला नाही.

वनक्षेत्रपाल, पाटण यांनी दिनांक ०२/०६/२०१५ रोजीच्या पत्रान्वये सदरचा रस्ता ज्या यंत्रणेकडून करण्याचे प्रस्तावित आहे. त्या यंत्रणेमार्फत अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वनहक्काची मान्यता) अधिनियम, २००६ व २००८ नुसार प्रस्ताव विहित मार्गे सादर करण्याबाबत सरपंच, ग्रामपंचायत ठोमसे यांना कळविले आहे. तथापि, प्रस्ताव अद्यापही अप्राप्त आहे.

---

**यवतमाळ जिल्ह्यातील सावळी सदोबा येथील घनदाट जंगलात परिपक्व सागवान वृक्षांची केलेली वृक्षतोड**

**(४७) ३६८४९ (१३-०१-२०१६). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यातील सावळी सदोबा येथील घनदाट जंगलात तब्बल १५० परिपक्व सागवान वृक्षांची वृक्षतोड करुन मराठवाड्यात दिनांक १२ ऑक्टोबर, २०१५ रोजी पाठविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वनविभागाने माहुर वनपरिक्षेत्रात काही दिवसांपुर्वी धाड घातली होती, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी सखोल चौकशी करुन अवैध वृक्षतोड करणा-यांना अटक करुन त्यांच्यावर कार्यवाही करण्यात येणार आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२४-०२-२०१६) :**(१) यवतमाळ जिल्ह्यातील सवळी सदोबा येथील घनदाट जंगलात १५० परिपक्व सागवान वृक्षांची वृक्षतोड करुन मराठवड्यात दिनांक १२.१०.२०१५ रोजी नेल्याची घटना घडल्याने निदर्शनास आले नाही. तथापि, दिनांक १८.१०.२०१५ रोजी माहूर वनपरिक्षेत्रातील वडसा, पडसा व गोकुळ (गोंडेगाव) या गावात धाडी टाकण्यात आल्या.

(२), (३) व (४) सदर धाडीमध्ये ३ आरोपी व १३१ नग माल जप्त करण्यात आला. चौकशी मध्ये आणखी ४ आरोपींची नावे निष्पन्न झाल्यामुळे दिनांक २९.१०.२०१५ रोजी मौजा राणी धानोरा येथील ४ आरोपींना पकडून त्यांना न्यायालयामध्ये हजर करण्यात आले. अशा प्रकारे एकूण ७ आरोपींवर कार्यवाही करण्यात आलेली आहे.

---

**भोकरदन (जि.जालना) तालुक्यातील हसनाबाद परिसरात अवैध वृक्षतोड होत असल्याबाबत**

**(४८) ३९२१६ (१३-०१-२०१६). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोकरदन (जि.जालना) तालुक्यातील हसनाबाद परिसरात मोठयाप्रमाण अवैध वृक्षतोड होत असल्याचे माहे नोव्हेंबर २०१५ च्या दुस-या आठवडयात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औरंगाबाद व सिल्लोड परिसरातील ठेकेदार परिसरात येवून अवैध वृक्षतोड करीत असल्याच्या तक्रारी स्थानिक ग्रामस्थांनी संबंधीत वनविभागाकडे अनेकवेळा करण्यात येवूनही अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही झालेली नाही हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुसार शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२४-०२-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) तक्रारी प्राप्त झालेल्या नसल्याने चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**ताम्हिणी ते सणसवाडी परिसरात दरवर्षी गाडी खाली चिरडून हजारो वन्य प्राण्याचा मृत्यू होत असल्याबाबत**

**(४९) ३९४१७ (२१-०१-२०१६). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) फर्ग्युसन महाविद्यालयाच्या (पुणे) पर्यावरण शाखेत शिकणाऱ्या विद्यार्थ्याने, ताम्हिणी घाटातील (पुणे) वन्य प्राण्यांचे अपघात, याबाबत गेले वर्षभर केलेल्या सर्वेक्षणात ताम्हिणी ते सणसवाडी, या २१ किमी च्या परिसरात दरवर्षी गाडी खाली चिरडून हजारो वन्य प्राण्याचा मृत्यू होत असल्याचे निदर्शनास आले आहे. हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अपघातामध्ये दुर्मीळ जातीच्या सापासह, शेकरु, रानमांजर व सर्वधिक सरपटणाऱ्या प्राण्याचे मृत्यू झाले असून, यामध्ये सापाचे प्रमाण जास्त आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार वन्यप्राण्यांचे अपघाती मृत्यू रोखण्याच्या दृष्टीने त्यांचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने, कोणती प्रभावी उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२३-०२-२०१६) :**(१) फर्ग्युसन महाविद्यालयाच्या (पुणे) पर्यावरण शाखेत शिकरणाऱ्या अनिश सुरेश परदेशी या विद्यार्थ्याने, ताम्हिणी घाटातील (पुणे) वन्य प्राण्यांचे अपघात याबाबत गेले वर्षभर केलेल्या सर्वेक्षणात ताम्हिणी ते सणसवाडी, या २१ कि.मी. च्या परिसरात २१७ सापांचा अपघाती मृत्यू झाल्याबाबत निरीक्षण नोंदविले आहे.

(२) प्रस्तुत निरीक्षण अहवालाचे अवलोकन करता सदर अभ्यास सरपटणाऱ्या प्राण्यांबाबत असून मृत प्राण्यांमध्ये सर्वच साप असल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) व (४) सदर वन्यप्राण्यांचे मृत्यू पावसाळ्यात व मुख्यत्वे रात्रीच्या वेळी झाल्याचे आढळून आले आहेत. ताम्हिणी घाटपरिसरात वन्यप्राण्यांच अपघाती मृत्यू रोखण्याच्या दृष्टीने तसेच संरक्षणाच्या दृष्टीने खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.

- ताम्हिणी घाटात वनकर्मचाऱ्यांकडून नियमित गस्त घालण्यात येते.
- घाट मार्गावर वन्यजीवांची माहिती देणारे माहिती फलक लावण्यात आलेले आहेत.
- घाट रस्त्यात वाहनांची वेगमर्यादा पाळावी त्यासाठी तेथे रबरी स्पीड ब्रेकर बसविणे प्रस्तावित आहे.
- वाहनांनी वेगमर्यादा पाळवी यासाठी सूचना फलक लावण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

## राज्यातील ताडोबा, पेंच, मेळघाट, नागझिरा व सहयाद्री या व्याघ्र प्रकल्पातील ५० वाघांच्या शिकारीबाबत

**(५०) ३९४२८ (२१-०१-२०१६). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेंच, ताडोबा, मेळघाट आदी व्याघ्र प्रकल्पातील वाघांच्या शिकार प्रकरणांचा तपास दोन वर्षापूर्वी सीबीआयकडे सोपविण्यात आल्यानंतर याप्रकरणी अटकेत असलेले मध्यप्रदेशातील कटनी भागातील, वाघ तस्कारांची चौकशी माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान केली असता, त्यांनी ताडोबा, पेंच, मेळघाट, नागझिरा व सहयाद्री या व्याघ्र प्रकल्पातील ५० वाघांची शिकार केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी व्याघ्र प्रकल्पाच्या क्षेत्रात कार्यरत असलेली एनजीओचा संबंध असून त्यांचे दिल्ली कनेक्शन असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी अधिक चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार याप्रकरणी संबंधितांवर कोणती कारवाई केली आहे व शिकाऱ्यांना प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने कोणती प्रतिबंधात्मक कार्यवाही केली आहे वा करण्यात येणार आहे?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२३-०२-२०१६) :**(१) व (२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) शासन व एन.टी.सी. ए. यांचे कडुन प्राप्त होणाऱ्या सुचना व मार्गदर्शन सुचनाचे अनुषंगाने वन्यप्राण्यांची अवैध शिकार होऊ नये व संरक्षणात दृष्टीकोनातून खालीलप्रमाणे उपाययोजना केलेल्या आहेत.

- व्याघ्र प्रकल्प क्षेत्रात वायरलेस यंत्रणा कार्यान्वित आहे.
- जंगलात आवश्यक त्या ठिकाणी संरक्षण मनोरे उभारलेले आहेत.
- संपूर्ण संरक्षित क्षेत्रात संरक्षण कुटयांची उभारणी केली असून, या ठिकाणी २४ तास वनकर्मचारी तैनात असतात.
- पेंच व ताडोबा व्याघ्र प्रकल्पात Special Tiger Protection Force (STPF) तैनात करण्यासाठी शासनाने नुकतीच मान्यता प्रदान केलेली आहे. तसेच नवेगाव-नागझिरा व मेळघाट व्याघ्र प्रकल्पात STPF तैनात करण्यासाठी शासनाने नुकतीच मान्यता प्रदान केलेली आहे. त्याअनुषंगाने पुढील कार्यवाही सुरु आहे.
- वनकर्मचाऱ्यांकडून संरक्षित क्षेत्रात नियमितपणे पायी ग्रस्त घालण्यांत येते तसेच वाहनाद्वारे गस्त घालण्यांत येते याचबरोबर पावसाळ्यात आवश्यक त्या ठिकाणी माजी सैनिकांद्वारे गस्त करण्यांत येते. वनकर्मचाऱ्यांना पिस्तुल, रायफलासारख्या शस्त्रांचा पुरवठा केलेला आहे. तसेच एखाद्या घटनेचा जलद गतीने पाठपुरावा करण्यासाठी वाहनाची सुविधा उपलब्ध करण्यांत आली आहे.
- वनक्षेत्रामध्ये पाणस्थळांची व पाणस्थळाकडे येणाऱ्या वन्यप्राण्यांच्या पायवाटांची नियमीतपणे तपासणी करण्यात येते व वरिष्ठ अधिकाऱ्यांद्वारे नियमीतपणे संनियंत्रण करण्यात येते.

- आवश्यक त्या ठिकाणी तपासणी नाके उभारण्यात आले असुन त्याद्वारे वाहनांची नेहमी तपासणी करण्यात येते.
- चंद्रपूर व नागपूर येथे Sniffer Dog ठेवण्यात आले. त्याचेद्वारे नियमीतपणे रेल्वे स्टेशन /बस स्टॅण्ड बाजार व संशयास्पद ठिकाणी वन्यप्राण्यांचे अवयवाचे अवैध व्यापार, वाहतूक याचा शोध घेण्यात येतो.
- वन्यप्राणी विशेषत: वाघाचे हालचालींचा मागोवा घेण्याकरीता त्यांच्या जाण्यायेण्याच्या संभावीत रस्त्यावर, पाणस्थळांजवळ नियमीतपणे कॅमेराट्रॅप लावण्यात येतात.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.